देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

Classifieds
जाहिरात करण्याचा
किफायतशीर मार्ग

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५७ । अंक १५ । शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर २०२५ । पाने - १४ | किंमत ₹ ५

**आतील पानात**

संपादकीय
लोका सांगे..

आंतरराष्ट्रीय
स्थलांतराविरोधात ब्रिटनमध्ये उद्रेक

आजकाल
रस्ते दुरुस्तीचा मार्ग अखेर सापडला..

# मराठा समाजाला दिलासा

## आरक्षण जीआरविरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठवाडा भागातील मराठा समाजाला कुणबी दर्जा देण्याच्या हैदराबाद गॅझेटीयरच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्य सरकारच्या २ सप्टेंबरच्या अध्यादेशाला आव्हान देणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. सरकारच्या अध्यादेशाचा याचिकाकर्त्यांवर कोणताच परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करत मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला.

याचिकादार पीडित नाहीत तसेच याच मुद्यावर काही व्यक्तींनी यापूर्वीच दाखल केलेल्या याचिकांमध्ये हस्तक्षेप अर्ज करण्याची आपणास मुभा आहे, असे सांगत ही याचिका खंडपीठाने फेटाळून लावली. यापूर्वी मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाविरोधात दाखल केलेल्या याचिका प्रलंबित असताना सरकारच्या अध्यादेशाला आव्हान देत वकील विनित धोत्रे यांनी ॲड. राजेश खोब्रागडे यांच्या-मार्फत स्वतंत्र जनहित याचिका दाखल केली होती. तिची गुरुवारी सुनावणी झाली. यावेळी ॲड. राजेश खोब्रागडे यांनी राज्य सरकारच्या अध्यादेशाला जोरदार आक्षेप घेतला. सरकारने या अध्यादेशाद्वारे पुरेशा माहितीशिवाय राजकीयदृष्ट्या प्रबळ आणि सामाजिकदृष्ट्या प्रगत समुदायाला मनमानीपणे ओबीसी दर्जा दिला आहे.

पान ८ वर »




### अन्य याचिकाकर्त्यांचा याचिकेला विरोध

या अध्यादेशाला आव्हान देणाऱ्या अन्य याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अनिल अंतुरकर व ॲड. वेंकटेश धोंड तसेच राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल डॉ. बिरेंद्र सराफ यांनी याचिकेलाच आक्षेप घेतला. मागासवर्गीय (ओबीसी) संघटनांनी आधीच उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे धोत्रे यांची जनहित याचिका दाखल करण्यायोग्य नाही, याकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

# आम्ही का बोलू नये?

## भुजबळांचा शरद पवारांना थेट सवाल

**मुंबई ।** मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात सुरू असलेल्या वादात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे अध्यक्ष शरद पवार यांनाच लक्ष्य केले आहे. आमचे आरक्षण जात असेल तर आम्ही बोलायला नको का? असा थेट सवाल भुजबळ यांनी पवारांना विचारला.



पत्रकारांशी बोलताना भुजबळ म्हणाले की, शरद पवारांना माझे सांगणे आहे की, मी शिवसेना सोडून तुमच्यासोबत आलो तो मंडल कमिशनसाठी. तुम्ही ते लागू केले, त्यासाठी तुमचे आभार मानले. पण आता आमचे ओबीसी

पान ८ वर »

### उद्धव ठाकरे सरकारवरही निशाणा

छगन भुजबळ यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील माजी सरकारवरही निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांचे सरकार होते तेव्हापासून मराठा समिती अस्तित्वात होती आणि त्यावेळी शरद पवार तिचे मार्गदर्शक होते. त्यात राष्ट्रवादीकडून अजित पवार आणि जयंत पाटील, शिवसेनेकडून एकनाथ शिंदे आणि सुभाष देसाई तर काँग्रेसकडून बाळासाहेब थोरात आणि अशोक चव्हाण होते. त्यावेळी आपण काहीच का बोलला नाहीत? असा सवाल भुजबळ यांनी केला.

## थोडक्यात

### छेड काढल्याचा संशय; मारहाणीत तरुणाचा मृत्यू

**लासलगाव ।** मुलीची छेड काढल्याच्या संशयावरून मुलीच्या संतप्त नातेवाईकांनी केलेल्या बेदम मारहाणीत छेड काढणाऱ्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना लासलगाव रेल्वे स्थानक परिसरात घडली. कुंदन चावरिया असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मनमाड रेल्वे पोलीस ठाण्यात पाच आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन आरोपींना अटक करण्यात आली असून दोन आरोपी फरार आहेत. दरम्यान, उर्वरित फरार आरोपींना तातडीने अटक करण्यात यावी यासाठी उद्या लासलगाव बंदची हाक देण्यात आली आहे.

(सविस्तर आतील पानात)

### मधुभाई कुलकर्णी कालवश



**छ. संभाजीनगर ।** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि मोदींचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे मधुभाई कुलकर्णी (८८) यांचे येथे निधन झाले. मधुभाई कुलकर्णी यांनी आपल्या कार्याची सुरुवात १९६२ साली जळगाव येथून तालुका प्रचारक म्हणून केली होती. त्यांच्या निधनाने संघाच्या वर्तुळात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कुलकर्णी यांनी आपले जीवन संघाच्या कार्यासाठी समर्पित केले होते आणि अनेक वर्षे त्यांनी विविध पदांवर राहून जबाबदारी सांभाळली.

# मतचोरीवर पुन्हा प्रहार

## राहुल गांधींनी दिला राजुरा मतदारसंघाचा दाखला

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा मतचोरीच्या मुद्यावरून भारतीय निवडणूक आयोग आणि केंद्रातील सत्ताधारी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. पत्रकार परिषद घेऊन त्यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रात मतचोरी झाल्याचे पुरावे सादर केले. महाराष्ट्रातील राजुरा विधानसभा मतदारसंघात मतदारांची संख्या वाढवून हे गैरप्रकार झाल्याचा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी म्हणाले, महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा विधानसभा मतदारसंघातही मतचोरीचे उदाहरण दिसून आले आहे. येथे पद्धतशीरपणे ६,८५० मतदार वाढवण्यात आले आहेत. यात ज्यांची नावे जोडली गेली आहेत त्यांनाही याची कल्पना नाही. यावेळी त्यांनी

पान ८ वर »

### निवडणूक आयोगाचे प्रत्युत्तर

राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. राहुल गांधींनी केलेले सर्व आरोप खोटे आणि निराधार आहेत. कोणताही सामान्य नागरिक ऑनलाईन पद्धतीने थेट मतदारांचे नाव हटवू शकत नाही, यासाठी एक कायदेशीर प्रक्रिया असते. कुठल्याही व्यक्तीचे नाव हटवण्यापूर्वी त्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतले जाते. दरम्यान, २०२३ मध्ये अलांड मतदारसंघात अशाप्रकारचे काही अपयशी प्रयत्न झाले होते आणि याप्रकरणी निवडणूक आयोगाने स्वतः एफआयआर नोंदवला होता, असे निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले. पुढे आयोगाने सांगितले की, २०१८ मध्ये आलांड मतदारसंघातून भाजपचे सुभद गुट्टेदार विजयी झाले होते. तर २०२३ मध्ये काँग्रेसचे बी. आर. पाटील हे विजयी झाले.

### इगतपुरीत अवैध कॉल सेंटरवर छापा

**इगतपुरी । प्रतिनिधी**

शहरातील मीनाताई ठाकरे संकुलात अवैध क्रेडिट कार्ड रक्कम, कर्ज रिकव्हरी करणाऱ्या कॉल सेंटरवर इगतपुरी पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत २४ लाख ३२ हजार रुपयांचे कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल व सीमकार्ड आदी मुद्देमाल जप्त करून दोघांना अटक करण्यात आली. अवैधरीत्या चालवण्यात येणारे विविध कॉल सेंटरची माहिती काढून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सुचना पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी दिल्या होत्या. त्यानुसार पथकाला मिळालेल्या गोपनिय माहितीवरून अवैधरीत्या चालणाऱ्या कॉल सेंटरवर छापा टाकण्यात आला.

( सविस्तर आतील पानात)

# पुढील दोन आठवडे पाऊस

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात पुढील दोन आठवडे पाऊस राहणार आहे. यामुळे परतीचा मान्सूनदेखील राज्यात जोरदार बरसणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

राज्याच्या अनेक भागात सध्या पाऊस बरसत आहे. अनेक भागात जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. साधारणपणे २१ सप्टेंबरपर्यंत राज्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस राहणार आहे. हवामान विभागाच्या १८ ते २५ सप्टेंबरच्या आठवड्यातील अंदाजानुसार, तळकोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थोडा अधिकचा पाऊस राहणार आहे. तर २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरच्या कालावधीत दक्षिण मध्य महाराष्ट्राचा काही भाग वगळता जोमदार पाऊस आहे. विशेष म्हणजे कोकण किनारपट्टीवर सरासरीच्या अधिकच्या पावसाचा इशारा या कालावधीत देण्यात आला आहे.

### पुढील चार दिवस राज्यात यलो अलर्ट


शुक्रवारी उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्राचा आणि मराठवाड्याचा काही भाग, उत्तर विदर्भाचा काही भाग, शनिवारी, रविवारी सोलापूर, दक्षिण मराठवाडामध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे.



### नाशकात पावसाचा मारा

गुरुवारी दुपारनंतर नाशिकला पावसाने पुन्हा झोडपले. दिवसा ढगाळ वातावरण आणि दुपारनंतर पावसाची तीव्रता वाढल्याने नाशिककरांची दैना उडाली. सखल भागात पाणी साचले. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीची कोंडी झाली. एबीपी सर्कल चौफुली, सातपूर महानगरपालिका कार्यालयाजवळ व त्र्यंबकरोडवर पाणी साचल्याने वाहनचालकांना अडचणींना सामोरे जावे लागले.

## कांदा भाव



| | |
|---|---|
| किमान | ५०० |
| कमाल | १७०० |
| सरासरी | ११७५ |

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३०१४ (+३२०) |
| निफ्टी | २५४२४ (+९३) |

## सोने-चांदी

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १,१०,००० |
| २२ कॅरेट | १,०१,०२० |
| चांदी (प्रतिकिलो) | १,२७,५०० |

## तापमान

| | |
|---|---|
| किमान | २२.४° |
| कमाल | २९.८° |

## मिश्किली

धनंजय एकबोटे



सखोल चौकशी केली. सविस्तर अहवाल आला आहे साहेब! राज्यात तुमच्यामुळेच वाढला असा ठपका आहे.

# वर्षा निवासस्थानावर वीस लाखांचे सोफासेट

**विरोधी पक्षाची टीका**

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा निवासस्थानी जवळपास वीस लाखांहून अधिक किमतीचे सोफासेट खरेदी करण्यात येणार आहेत. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई इलाखा शहर विभागाने निविदा जारी केली आहे. या निर्णयावर विरोधी पक्षाने टीकास्त्र सोडले आहे.

जारी झालेल्या निविदेनुसार वर्षा निवासस्थानी डबल बेड मॅट्रेससह ८ बेड, ४ डबल सीट सोफासेट, २ सिंगल सीट सोफासेट, १५ खुर्चा आणि ६ टेबल खरेदी केले जाणार आहेत. त्यासाठी २० लाख ४७ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय वर्षावरील स्वयंपाकघर दुरुस्तीसाठी

पान ८ वर »

### अदानी समूहाला सेबीची क्लीन चिट

**मुंबई ।** हिंडेनबर्ग रिसर्चने केलेल्या गंभीर आरोपांनंतर भारतीय बाजार नियामक संस्था सेबीने अखेर अदानी समूहाला क्लीन चिट दिली आहे. सेबीने या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यानंतर अदानी समूहावर कोणतेही गैरकृत्य सिद्ध झाले नसल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयानंतर अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी 'सत्यमेव जयते' असे ट्विट करत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# निर्दोषमुक्त आरोपींना उच्च न्यायालयाची नोटीस

**मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण**

**मुंबई । प्रतिनिधी**

२००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या विशेष सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध दाखल केलेल्या अपिलाची मुंबई उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने या प्रकरणात निर्दोष मुक्त झालेल्या सर्व सात आरोपींना तसेच या प्रकरणाचा तपास करणाऱ्या राष्ट्रीय तपास यंत्रणेला नोटीस बजावली आहे.

या नोटिसीमुळे भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर,

पान ८ वर »




Nashik Gramin Shikshan Prasarak Mandals Nashik

**COLLEGE OF PHARMACY**

Brahma Valley Education Campus, Anjaneri, Trimbak Road Nashik-422 213

(The College is approved by AICTE, New Delhi & Pharmacy Council of India, New Delhi Gov. of Maharashtra Affiliated to Savitribai Phule Pune University.) NAAC B+ Grade Web site: www.brahmavalley.com Email: brahmavalleyho2000@gmail.com

**APPIONTMENTS**

Applications are Invited For Following Post.

| Sr. No. | Subject | Designation | Total Post |
|---|---|---|---|
| 1 | Principal | Professor | 01 |
| 2 | Pharmaceutics | Associate Professor | 01 |
| | | Assistant Professor | 03 |
| 3 | Pharmaceutical Chemistry | Associate Professor | 01 |
| | | Assistant Professor | 03 |
| 4 | Pharmacology | Associate Professor | 01 |
| | | Assistant Professor | 02 |
| 5 | Pharmacognosy | Associate Professor | 01 |
| | | Assistant Professor | 01 |
| 6 | Librarian | M.Lib. NET/SET | 01 |
| 7 | Pharmacy Practice | Assistant Professor | 01 |

1) Salary as per 7 th pay commission for eligible candidates.
2) Interested candidates must submit applications to brahmavalleyho2000@gmail.com within 7 days from the date of this advertisement, and come with photocopies of resume and all testimonials.

**Add:-** 11, Krishna Vihar Appt., Behind HDFC House, Sharanpur-Trimbak Link Road, Canada Corner, Nashik-05. Phone: 0253-2311244.

Dr. V.D. Wagh        Shri. R.D. Pangavhane

# पालखेड डावा कालव्याला नवसंजीवनी

## पन्नास वर्षानंतर आधुनिक होणार; १,२८३ कोटींचा प्रकल्प

**नाशिक । प्रतिनिधी**

तब्बल पाच दशकांनंतर पालखेड डावा कालव्याच्या आधुनिकीकरणाची योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. केंद्रीय जल आयोग आणि एशियन डेव्हलपमेंट बँक (एडीबी) यांच्या संयुक्त विद्यमाने राबवला जाणारा हा 'इरिगेशन मॉडर्नायझेशन प्लॅन' पाणी गळती रोखून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ देणार असून जलसिंचनात ते क्रांतिकारी पाऊल ठरणार आहे. या योजनेसाठी एकूण



१,२८३ कोटी रुपयांचा निधी खर्च होणार असून, राज्य आणि केंद्र सरकारच्या संयुक्त सहकार्याने ती अमलात येईल.

पालखेड पाटबंधारे विभागाने नवी दिल्ली येथे केंद्रीय जल आयोगासमोर सादरीकरण केले असता योजनेच्या प्राथमिक प्रकल्प अहवालाला महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा, नियोजन आणि वित्त विभागांकडून तत्त्वतः मान्यता मिळाली. आता हा प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून भारत सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार होईल. एडीबीच्या अर्थसहाय्याने राज्य शासन

पान ८ वर »

### शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

पाण्याच्या टंचाईने ग्रस्त असलेल्या नाशिक, अहिल्यानगर आणि इतर जिल्ह्यांसाठी ही योजना वरदान ठरेल. या आधुनिकीकरणामुळे पाण्याची गळती २०-३० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर कामांना तत्काळ सुरुवात होईल, अशी अपेक्षा आहे.